सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

ग्रामविकास विभाग

# महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७

(३१ जुलै १९९१ पर्यंत सुधारित)

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई
१९९२

CamScanner
Scanned with OKEN Scanner

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| १—चालू | | [1][(दोन) सहाय्यक बालविकास प्रकल्प-अधिकारी (एकत्रित बालविकास सेवा) | (१) नेमणुका एक तर,—<br>(अ) एकत्रित बालविकास सेवेत किंवा जिल्हा परिषदेमध्ये काम करण्याची जी मुख्य सेविका किंवा पर्यवेक्षक किमान माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तीची समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेली असेल आणि जिने (एकात्मिक बालविकास सेवेत) मुख्य सेविका म्हणून किंवा पर्यवेक्षक म्हणून काम एकमान ३ वर्षे अखंड सेवा केलेली असेल त्यांना वढती देऊन, किंवा<br>(ब) (एक) जिल्हा परिषदेच्या सेवेत आधीपासून जे उमेदवार असतील ते खेरीज करून, जे २८ वर्षांपेक्षा अधिक वयाचे नसतील, आणि<br>(दोन) जे राज्य शासनाने मान्यता दिलेली, समाजविज्ञान किंवा गृहविज्ञान किंवा पोषण किंवा बालविकास या विषयातील पदवी जे धारण करीत असतील,—<br>अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे केल्या जातील :<br>परंतु ग्रामकल्याण व समाजकल्याण आणि स्थानिक विकासाच्या क्षेत्रातील ज्यांना तीन वर्षांचा प्रत्यक्ष कामाचा अनुभव आहे अशा उमेदवारांना अग्रक्रम दिला जाईल.<br>(२) वढतीद्वारे व नामनिर्देशनाद्वारे केलेल्या नेमणुकांचे गुणोत्तर ३ : १ असेल :<br>परंतु या नियमांतील कोणत्याही गोष्टीमुळे, जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अधिकाऱ्यांनी शासनाच्या ग्रामविकास विभागांचे अर्धशासकीय |

१२६

[1] शासन अधिसूचना, दिनांक २३ मे १९९० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.



| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| १—चालू | | | पत्र क्रमांक आयसीडी. १०८८/सीआर–१५११/४७, दिनांक ३० नोव्हेंबर १९८८ यात दिलेल्या आदेशांना अनुलक्षून, सहाय्यक बालविकास अधिकारी (एकात्मिक बालविकास योजना) या पदावर केलेल्या नेमणुकांना बाध येणार नाही.<br>(३) वढतीद्वारे किंवा नामनिर्देशनाद्वारे नेमणूक झालेल्या व्यक्तींना, नेमणुकीच्या तारखेपासून दोन वर्षांच्या आत एकात्मिक बालविकास सेवा कार्यक्रमासाठी विशेष प्रशिक्षण घ्यावे लागेल आणि नमुना 'अ' मधील करारपत्र करून द्यावे लागेल. |
| | | (तीन) मुख्य सेविका .. | (१) नेमणुका,—<br>(अ) जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम समाजकल्याण) श्रेणी एक, यातील जी ग्रामसेविका माध्यमिक शाळा, प्रमाणपत्र परीक्षा किंवा तिची समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेली असेल आणि जिने ग्रामसेविका म्हणणून किमान ती वर्षे सेवा केलेली असेल आणि जी, त्या पदासाठी विहित केलेल्या परीक्षेत अर्ह ठरलेली असेल अशा योग्य ग्रामसेविका वढती देऊन करण्यात येईल :<br>परंतु, ज्या ग्रामसेविकेने ग्रामसेविका म्हणून ७ वर्षांहून कमी नाही इतक्या काळापर्यंत अखंड सेवा केलेली असेल आणि त्या पदासाठी विहित केलेल्या परीक्षेत ती अर्ह ठरलेली असेल, तिच्याबाबत माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण होण्याची अट शिथिल करता येईल : किंवा<br>(ब) (एक) ज्या महिला उमेदवार आधीपासूनच जिल्हा परिषदेच्या सेवेत असतील व ज्यांचे वय ३० वर्षांपेक्षा अधिक नसेल अशा; आणि |

१२७

Scanned with OKEN Scanner

सेवेत असतील व ज्यांचे वय ३० वर्षांपेक्षा अधिक नसेल अशा; आणि



(१) (२) (३) (४)

१—चालू

(दोन) ज्या मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या स्नातक पदवी धारण करीत असतील,—

अशा महिला उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :

परंतु, मान्यताप्राप्त विद्यापीठाची समाजकार्य किंवा शिक्षण या विषयातील स्नातक पदवी धारण करीत असलेल्या उमेदवारांना अग्रक्रम दिला जाईल.

(२) बढतीद्वारे व नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्याचे गुणोत्तर ३ : १ राहील.

(३) या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तींना समाज शिक्षणाचा प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण करावा लागेल आणि नमुना 'अ' मधील करारपत्र करून द्यावे लागेल.

(चार) पर्यवेक्षिका (एकात्मिक बाल-विकास सेवा)

(१) नेमणूक एक तर,—

(अ) जिल्हा परिषदेतील योग्य मुख्य सेविकेची बदली करून, किंवा

(ब) बदलीसाठी मुख्य सेविका उपलब्ध नसतील तर, जिल्हा सेवा-(वर्ग तीन) (दुय्यम समाजकल्याण) श्रेणी एक यातील ज्या ग्राम-सेविका माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या असतील आणि ज्यांनी ग्रामसेविका म्हणून किमान ३ वर्षे अखंड सेवा केलेली असेल व ज्या मुख्य सेविकेच्या पदासाठी विहित केलेल्या परीक्षेत अर्ह ठरलेल्या असतील, अशा सुयोग्य ग्राम-सेविकांना बढती देऊन करण्यात येईल :

परंतु, ज्या ग्रामसेविकेने ग्रामसेविका म्हणून ७ वर्षांहून कमी नाही एवढ्या काळापर्यंत अखंड सेवा केलेली असेल आणि जी मुख्य सेविकेच्या



(१) (२) (३) (४)

१—चालू

पदासाठी विहित केलेल्या परीक्षेत अर्ह ठरलेली असेल तिच्या बाबतीत, माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण होण्याची अट शिथिल करता येईल, किंवा

(क) पुढील महिला उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :—

(एक) ज्या महिला उमेदवार आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत असतील व ज्या ३० वर्षांपेक्षा अधिक वयाच्या नसतील अशा महिला उमेदवार :

परंतु, आवश्यक शैक्षणिक अर्हता असणाऱ्या बालसेविका व अंगणवाडी सेविकांच्या बाबतीत, कमाल वयोमर्यादा आणखी १५ वर्षांच्या कालावधीकरिता किंवा ४५ वर्षे वयापर्यंत किंवा त्यांनी, बालसेविका किंवा अंगणवाडी सेविका किंवा बालवाडी सेविका किंवा ग्राम-सेविका किंवा बालवाडीतील किंवा शिशु शिक्षण वर्गातील किंवा शाळापूर्व शिक्षण केंद्रातील किंवा पूरक पोषण केंद्रातील शिक्षिका म्हणून जेवढा काळपर्यंत सेवा केलेली तेवढ्या कालावधीकरिता शिथिल करता येईल. मात्र अशा बालवाडीला किंवा शिशु शिक्षण वर्गाला किंवा शाळापूर्व शिक्षण केंद्राला किंवा पूरक पोषण केंद्राला, त्यासाठी पुढीलपैकी कोणत्याही एका संस्थेकडून अनुदान मिळत असले पाहिजे, अशी अट राहील,—

(एक) केंद्र किंवा राज्य शासन;

(दोन) केंद्रीय समाजकल्याण मंडळ किंवा राज्य समाजकल्याण मंडळ;

(तीन) रेडक्रॉस;

Scanned with OKEN Scanner

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| १—चालू | | | (चार) मानवी संसाधान विभाग मंत्रालयाकडून बालवाडी पोषण कार्यक्रमांतर्गत अनुदान मिळणाऱ्या, राष्ट्रीय पातळीवरच्या स्वेच्छा संघटनांपैकी म्हणजेच, केंद्रीय समाजकल्याण मंडळ, भारतीय बालकल्याण परिषद, हरिजन सेवक संघ, भारतीय आदिम जाती सेवक संघ व कस्तुरबा गांधी नॅशनल मेमोरियल ट्रस्ट या संघटनांपैकी कोणतीही एक :<br>परंतु, आणखी असेकी, कमाल वयोमर्यादेची ही अट, मध्यम स्तर एकात्मिक बालविकास सेवा अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षण केंद्राच्या अध्यापिका किंवा मुख्याध्यापिका यांच्या बाबतीत, तिने जेवढा काळ अध्यापिका किंवा सु मुख्याध्यापिका म्हणून किंवा दोन्ही नात्याने उक्त प्रशिक्षण केंद्रात सेवा केली असेल तेवढ्या काळा-करिता शिथिल करता येईल, मात्र, हा काळ कमाल १५ वर्षाचा किंवा वयाच्या ४५ वर्षापर्यंतचा असेल;<br>(दोन) (अ) ज्यांनी एखाद्या संविधिक विद्यापीठाची, खासकरुन समाजशास्त्र किंवा गृहविज्ञान किंवा शिक्षण किंवा बालविकास किंवा पोषण किंवा समाजशास्त्र या विषयांतील स्नातक ही पदवी धारण केली आहे; किंवा<br>(ब) ज्यांनी स्नातक पदवी धारण केली असून ज्या मध्यम स्तर समन्वित बालविकास सेवा अधिकाऱ्यांच्या व अंगणवाडी सेविकांच्या अध्यापिका व मुख्याध्यापिका म्हणून काम करीत आहेत, किंवा वरील उपखंड (एक) च्या पहिल्या परंतुकात उल्लेखिलेल्यापैकी एका केंद्रात बालसेविका किंवा आंगणवाडी सेविका म्हणून काम करीत आहेत; किंवा |
| १—चालू | | | (क) ज्या माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा इतर समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झाल्या आहेत व ज्यांनी बालसेविकेचे ११ महिन्यांचे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले असून, ज्यांना; बालवेसेविका किंवा आंगणवाडी सेविका म्हणून काम करण्याचा ५ वर्षाचा अनुभव आहे; किंवा<br>(ड) ज्या माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा इतर समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झाल्या आहेत व ज्यांना आंगणवाडी सेविका म्हणून ७ वर्षाचा अनुभव आहे;<br>परंतु, खंड (ब), (क) आणि (ड) मध्ये विहित केलेल्या अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.<br>(२) पदोन्नतीद्वारे व नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्तीचे गुणोत्तर १ : १ असे असेल :<br>परंतु, या नियमांमध्ये काहीही असले तरीही, जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी, शासकीय ग्रामविकास विभाग, अर्धशासकीय क्रमांक आयसीडी. १०८८/सीआर-१५११/४७, दिनांक ३० नोव्हेंबर १९८८ मध्ये समाविष्ट असलेल्या आदेशास अनुलक्षून त्या पर्यवेक्षक एकात्मिक बालविकास सेवा) या पदावर केलेल्या नियुक्तांना बाध येणार नाही.<br>(३) त्या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तींनी, त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत एकात्मिक बालविकास कार्यक्रमासाठी असलेले विशेष प्रशिक्षण घेणे आवश्यक असेल व त्या नमुना 'अ' मधील करारपत्र करून देतील.) |